CMYK

मधुसूदन अग्रवाल 'कॉनसुलर ऑफ द इयर' पुरस्काराने सन्मानित >>पान 2

कॉपीमुक्त शिक्षणासाठी शासनाने पावले उचलावे >>पान 3

मेहकर तालुक्यात लेआउटचा सावळा गोंधळ >>पान 4

**सुविचार**

क्षमा ही सर्वात मोठी शक्ती आहे.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 222 ■ बुधवार, दि. 26 मार्च 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




मी त्याला स्वीकारण्यास तयार, हर्दिकसोबतच्या घटस्फोटानंतर नताशाचं नवं विधान! आतील पान

# चित्रीकरण परवानगीसाठी एक खिडकी प्रणालीचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अनावरण

**मुंबई/प्रतिनिधी: चित्रीकरणासाठी लागणाऱ्या विविध विभागांच्या परवानग्या सुलभरीतीने व मुदतीमध्ये मिळाव्यात या दृष्टीने ऑनलाईन प्रणालीद्वारे एक खिडकी योजना सुरू करण्यात आली आहे. मुंबई व उपनगर परिसरात चित्रीकरण परवानगीसाठी एक खिडकी प्रणाली अंतर्गत सात दिवसांत परवानगी मिळणार आहे. या प्रणालीचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.**

## ■ चित्रीकरणासाठी सात दिवसांत परवानगी
## ■ सांस्कृतिक कार्य विभागाच्या १०० दिवस कार्यपूर्तीसंदर्भात सादरीकरण



विधीमंडळ येथे सांस्कृतिक कार्य विभागाच्या १०० दिवसांची कार्यपुर्तीसंदर्भात सादरीकरण करण्यात आले होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्य विभाग मंत्री ड आशिष शेलार, उद्योग मंत्री उदय सामंत, विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, मुख्य सचिव सुजाता सौनिक, विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, फिल्म सिटीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. १०० दिवस कार्यक्रम अंतर्गत उद्दिष्ट पुर्ण केल्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी विभागाचे अभिनंदन केले.

ईज ऑफ डुईंग बिझनेस अंतर्गत मुंबई व मुंबई उपनगरातील चित्रपट, टीव्ही मालिका, जाहिरातपट व माहितीपट इत्यादींच्या चित्रीकरणांसाठी एक खिडकी योजनेअंतर्गत आता सात दिवसांत परवानगी मिळणार असल्याची माहिती यावेळी विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी दिली. 'एक खिडकी प्रणाली ही राज्यभरातील चित्रीकरणाची परवानगी मिळविण्यासाठी निर्माते, निर्मिती संस्थांना आणि लोकेशन मॅनेजर यांना माहिती देणारी एकमेव ऑनलाईन प्रणाली असून महाराष्ट्रभर या प्रणालीचा विस्तार करण्यात आला असून त्या दृष्टीने प्रणालीचे अद्यावतीकरण करण्यात आले आहे.

**एनडी स्टुडिओसाठी १३० करोड रूपये निधी**

यावेळी सुप्रसिद्ध कलादिग्दर्शक दिवंगत नितीन देसाई यांच्या एन डी आर्ट वर्ल्ड परिचालनासाठी महाराष्ट्र शासनाअंतर्गत फिल्मसिटी मुंबईकडे सोपविण्यात आला असून, यासाठीचा धनादेश मुख्यमंत्री यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. शासमार्फत हा स्टुडिओ दायित्व १२० कोटी व परिचालनासाठी १० कोटी असे १३० कोटी टप्प्याने टप्प्याने प्रदान करण्यात आले असून, दायित्व प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

**अहिल्यादेवींच्या कारकिर्दीतील बारव स्थापत्य कॉफीटेबल बुकचे प्रकाशन**

पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जन्मवर्षानिमित्त विशेष ग्रंथाचे आणि अहिल्यादेवी होळकर यांच्या कारकीर्दीतील बारव स्थापत्य या कॉफीटेबल बुकचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

पाण्याचे महत्व जाणून राज्यातील जनतेसाठीच नव्हे तर विविध प्रांतातील लोकांसाठी जलस्त्रोताचे जतन व संवर्धन करण्याच्या दृष्टीने अळिल्यादेवींनी बारवांची निर्मिती केली व आवश्यक त्या ठिकाणी त्यांचे जिर्णोद्धारही केले. या ग्रंथात अहिल्यादेवींच्या कारकिर्दीतील तसेच अन्य जीर्णोद्धारित काही निवडक बारव, पायविहिर, तलाव, पुष्करणी या जलव्यवस्थापनाच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्वाच्या असलेल्या स्थानांची. छायाचित्रांसह संक्षिप्तपणे माहिती देण्यात आली आहे. जन्मशताब्दी निमित्त प्रकाशीत ग्रंथात जन्मस्थळ चौंडी, राजधानी महेश्र्वरी, उपराजधानी चांदवड, इंदूर येथील राजवाडा, कारकिर्दीतील प्रशासन, लोककल्याणकारी धोरण, न्यायदान, आर्थिक नियोजन, चलन, राजचिन्ह अश्या महत्वपूर्ण पैलू संदर्भात परंतु महत्वपूर्ण माहिती या ग्रंथात देण्यात आली आहे.

## सीआरझेड आणि एनडीझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांविरोधात कारवाई – महसूल मंत्री बावनकुळे



**मुंबई/प्रतिनिधी :** कोस्टल रेग्युलेशन झोन (सीआरझेड) आणि नो डेव्हलपमेंट झोन (एनडीझेड) क्षेत्रातील झालेल्या अनधिकृत २६७ बांधकामांविरोधात महानगरपालिकेसमवेत बैठक घेऊन कारवाई करण्यात येईल. तसेच या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक नेमले जाणार असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले. याबाबत सदस्य अतुल भातखळकर यांनी लक्षवेधी सूचना मांडली. यावेळी सदस्य योगेश सागर यांनी सहभाग घेतला. मंत्री बावनकुळे म्हणाले, या प्रकरणी चौकशीसाठी जमाबंदी आयुक्त व संचालक,भूमी अभिलेख यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठित करण्यात आली होती. या चौकशी समितीने दिलेल्या अहवालामध्ये मुंबई उपनगर भूमी अभिलेख यांच्या कार्यालयातील मुळ ८८४ हद्द कायम नकाशांपैकी १६५ नकाशांमध्ये व नगर भूमापन अधिकारी, गोरेगांव यांच्या अभिलेखातील नगर भूमापन चौकशीच्या वेळेचे ९ आलेखात छेडछाड झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

# सामाजिक तेढ निर्माण होईल असे कृत्य कोणीही करू नये

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर/प्रतिनिधी :** हिंसाचार घटनेच्यानंतर यूट्यूब वर लोकांना माहिती देताना व्हिडिओ पोस्ट करू नये. दोन समाजात तेढ निर्माण होईल असे कृत्य कोणीही करू नये, असे आआवाहन नागपूर चे पोलीस आयुक्त रवींद्र कुमार सिंघल यांनी पत्रकार परिषदेत केले. यावेळी पोलीस आयुक्त रवींद्र कुमार सिंघल म्हणाले की, कोणाच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचेल असे व्हिडिओ पोस्ट करू नये, युट्यूबअर वर आमची नजर असणार आहे. यापुढे अशा पद्धतीचे काय असल्यास कारवाई केली जाणार आहे. यामध्ये ११४ च्या पेक्षा अधिक लोकांना ताब्यात घेतलेले आहे. १३ एफ आय आर दाखल झालेले आहेत. त्यामध्ये आणखी लोकांना अटक करण्यात येत आहे. सोशल माध्यमातून वेगळे गुन्हे दाखल केले आहे. काही युट्युबवर कारवाई केली जाणार आहे. गुन्हेगारांवर कडक कारवाई झाली पाहिजे, त्यासाठी आम्ही गुन्हे दाखल केले आहे. अवैध बांधकाम असल्यास नियमितपणे कारवाई करत असतो. गुन्हेगाराची जात किंवा धर्म नसतो. ज्या लोकांचे नाव निष्पन्न होईल त्यावरही अशाच पद्धतीची कडक कारवाई केली जाईल. पंतप्रधानाच्या दौऱ्याच्या अनुषंगाने आम्ही तयारी सुरू केली आहे. नागपुरात हिंसाचार घटनेला सात दिवस लोटलेले आहे. सध्या परिस्थिती नियंत्रणात आणि शांततेत आहे. पंतप्रधान यांच्या दौऱ्यात यांच्या सुरक्षेत कुठलीही तडजोड होत नाही. नागपूर पोलीस दौऱ्यात सुरक्षा पुरवण्यासाठी तयार आहेत. पुढील काळात येणारे धार्मिक सण आहे, त्यावरही आम्ही लक्ष ठेवून आहोत. अशी माहिती पोलीस आयुक्त रवींद्र कुमार सिंघल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

**पोलीस आयुक्त रवींद्र कुमार सिंघल यांचे आवाहन**

# भाजपकडून ३२ लाख 'सौगात ए मोदी' किटचे वाटप

## रमजाननिमित्त मुस्लिम बांधवांना भेट

**नवी दिल्ली : देशभरात एकीकडे रमजान ईदचा उत्साह असून दुसरीकडे महाराष्ट्रात मराठी नववर्ष म्हणजे गुढी पाडव्याच्या आगमनाची आतुरता पाहायला मिळत आहे. गुढी पाडवा आणि रमजान ईद हे दोन्ही उत्सव एकापाठोपाठ एक आल्याने हिंदू व मुस्लिम बांधव सणाच्या तयारीला लागले आहेत. सामाजिक सौहार्द व बंधुप्रेम जपत दोन्ही सण साजरे होत आहेत. त्यातच, भाजपने ३२ लाख मुस्लिम बांधवांना ईदनिमित्ताने ईदी भेटवस्तू देण्याचा निर्णय घेतला आहे. 'सौगात ए मोदी' नावाने भाजपच्या अल्पसंख्यांक विभागाकडून ३२ लाख मुस्लिम बांधवांना हे कीट देण्यात येणार आहेत.**



या कीटसंदर्भात बोलताना भाजपचे महासचिव दुष्यंत गौतम यांनी म्हटले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी नवरात्रीनिमित्ताने हिंदू बांधवांना तर बडे दिननिमित्त ईसाई बांधवांना भेटवस्तू देतात. त्यामुळे, आता ईदनिमित्त मुस्लिम बांधवांना ही भेट दिली जात असून मोदींवर सर्वच मुस्लिम बांधव प्रेम करतात, असेही गौतम यांनी म्हटले.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सूचनेनुसार राजधानी दिल्लीतील निझामुद्दीन येथून मंगळवारी भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांच्या उपस्थितीत सौगात ए मोदी या कीटचे वाटप करण्यास सुरूवात होणार आहे. देशभरातली ३२ लाख गरीब मुस्लिम बांधवांना सौगात ए मोदी कीट भेट स्वरुपात देण्यात येणार आहे. भाजपच्या अल्पसंख्याने विभागाने याबाबत आनंद व्यक्त केला आहे. भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष जमाल सिद्दिकी, मोर्चाचे प्रभारी आणि भाजप महासचिव दुष्यंत गौतम यांच्यासह अनेक भाजप नेते या कार्यक्रमाला उपस्थित असणार आहेत. पंतप्रधान मोदींना कुठलाही एक धर्म जास्त जवळचा नसून ते सर्वच धर्मावर प्रेम करतात. त्यामुळेच, मोदींवर सर्वच मुस्लिम प्रेम करतात. देशातील पंतप्रधान आपलाच आहे, आपला मुलगा आहे, आपला भाऊ आहे असं प्रत्येकाला वाटलं पाहिजे. त्यामुळेच, देशभरातली ३२ लाख गरीब मुस्लिम कुटुंबात सौगात ए मोदी किट भेट स्वरुपात देण्यात येणार आहे, असेही दुष्यंत गौतम यांनी म्हटलं.

**३२ हजार कार्यकर्ता करणार काम**

भाजपने देशभरातली ३२ हजार कार्यकर्त्यांन या सौगात ए मोदीची जबाबदारी दिली आहे. भाजपचा प्रत्येक कार्यकर्ता एका मस्जिदची जबाबदारी घेणार आहे. त्यानुसार, देशभरातली ३२ हजार मस्जिदींजवळ गरीब मुस्लिम बांधवांना सौगात ए मोदी कीटचे वाटप केले जाईल. यासह जिल्हा स्तरावर भाजपच्यावतीने ईद मिलन कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आलं आहे.

**सौगात ए मोदी कीटमध्ये काय?**

भाजपकडून देण्यात येणाऱ्या सौगात ए मोदी कीटमध्ये नेमकं काय असणार आहे. तर, या कीटमध्ये नवीन कपडे, शेवया, खजूर, काजू-बदाम आणि साखर असणार आहे. तर, महिलांना देण्यात येणाऱ्या कीटमध्ये सूटचे कापड असणार असून पुरुषांच्या कीटमध्ये कुर्ता-पायजमाचा कपडा असेल.

# धरणातील गाळ काढण्याच्या कामास प्राधान्य द्या – जिल्हाधिकारी यांचे निर्देश

**दैनिक आपला विदर्भ**



**बुलढाणा /प्रतिनिधी :** संपूर्ण राज्यात पाणी आडवा, पाणी जिरवा या योजनेंतर्गत जलसंधारणाच्या कामाला सर्वत्र सुरुवात झालेली आहे. त्याअनुषंगाने जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात असणारे धरण, नद्या नाले यांचे सर्वेचे काम पूर्ण करण्यात आले असून यातील गाळ काढण्याच्या कामास प्रथम प्राधान्य देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या.

महाराष्ट्राला पाणीटंचाईपासून मुक्त करण्यासाठी व सुजलाम सुफलाम होण्यासाठी फार मोठ्या प्रमाणात 'पाणी आडवा पाणी जिरवा ही योजना युद्ध पातळीवर कार्यान्वित करण्यात आलेली असून यासाठी वेगळ्या निधीची राज्य शासनाने अर्थसंकल्पात तरतूद करून ठेवली आहे. यासाठी महाराष्ट्र शासन व भारतीय जैन संघटना यांच्यामध्ये सामंजस्य करार राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे उपस्थितीत मुंबई येथे करण्यात आल्यानंतर मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने ठीक ठिकाणाचे धरणातील गाळ काढण्यासाठी आराखडे तयार करण्यात येत असून लहान मोठी धरणे, नद्या, नाले यातील गाळ काढून सिंचन क्षमता वाढवण्याचा उद्देश ठेवण्यात आलेला आहे.

जिल्ह्यामध्ये सद्यास्थितीत विविध १०९ लहान मोठ्या धरणातील गाळ काढण्याचे निश्र्चिती केली असून प्रत्यक्षात ३२ कामांचे कार्यारंभ आदेश एजन्सीला देण्यात आलेले आहे. उर्वरित कामाचे कार्यारंभ आदेश तात्काळ देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांनी दिले. तसेच जिल्ह्यात ज्या ज्या ठिकाणी गाळ काढणे अपेक्षित आहे, अशा ग्रामपंचायतीची माहिती मृद व जलसंधारण विभाग व भारतीय संघटनेचे पदाधिकारी यांना देण्याबाबतचे आवाहन डॉ. किरण पाटील यांनी केले.

यावेळी बीजेएसचे राज्य कार्यकारणी सदस्य सन्मती जैन सुजलाम सुफलामचे माजी अध्यक्ष राजेश देशलहरा, पश्र्चिम विदर्भ अध्यक्ष कीर्तीकुमार वायकोस, जिल्हाध्यक्ष मंगलचंद कोठारी, सुजलाम सुफलामचे जिल्हाध्यक्ष विनोद कुमार सुराणा, देऊळगाव राजाचे शहराध्यक्ष पियुष खडकपूरकर मुन्ना बेगानी उपस्थित होते.

CMYK

## भारत आनंदी का नाही?

२० मार्च हा दिवस जागतिक आनंद दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून संयुक्त राष्ट्र संघाच्या सस्टनेबल डेव्हलपमेंट सोल्युशन नेटवर्कद्वारे दरवर्षी एक सर्व्हे केला जातो. संपत्ती, आरोग्या बरोबरच परस्परंवरील विश्र्वास, ऋणानुबंध, करुणा या निकषांच्या आधारावर हे सर्व्हेक्षण केले जाते. वरील निकषांचा विचार करून यावर्षीही या संस्थेने जगातील १४७ देशांचा सर्व्हे करून एक अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालात या संस्थेने जगातील सर्वाधिक आनंदी देशांची यादी प्रसिद्ध केली. या यादीतील पहिल्या वीस देशांमध्ये युरोपातील देशांचे वर्चस्व आहे. गेल्या अनेक वर्षापासून युद्धाच्या आगीत होरपळणारा इस्त्राईल हा देश आनंदी देशांच्या यादीत आठव्या स्थानी आहे. सतत युद्धाच्या छायेत राहूनही इस्त्रायली नागरिक आनंदी आहेत. या अहवालानुसार जगातील सर्वात आनंदी देश म्हणून फिनलँड या देशाची निवड करण्यात आली. विशेष म्हणजे फिनलँड हा देश सलग आठव्यांदा जगातील सर्वात आनंदी देश ठरला आहे. भारत मात्र या देशांच्या यादीत खूप खालच्या क्रमांकावर आहे. १४७ देशांच्या यादीत भारत ११८ व्या क्रमांकावर आहे. विशेष म्हणजे पाकिस्तान, नेपाळ, आणि चीन हे भारताच्या शेजारी देश भारतापेक्षा अधिक आनंदी आहेत असा हा अहवाल सांगतो. पाकिस्तान, नेपाळ आणि चीन यासारख्या देशात सध्या मोठया प्रमाणात अराजकता माजली असताना देखील ते देश आनंदी आहेत इतकेच काय तर युद्धग्रस्त युक्रेन आणि पॅलेस्टाईन हे देशही भारतापेक्षा अधिक आनंदी आहेत. आनंदी देशांच्या यादीत युक्रेन १११ व्या क्रमांकावर आहे तर पॅलेस्टाईन १०८ व्या क्रमांकावर आहे. जगातील गरीब, मागास आणि युद्धाच्या छायेत असणाऱ्या देशातील लोक आनंदी असताना भारतासारख्या खंडप्राय देशातील लोक आनंदाबाबतीत तळाच्या स्थानी असणे ही चिंतेचीच बाब आहे. भारतातील नागरिक आनंदी का राहू शकत नाहीत, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. फिनलँडने सलग आठव्यांदा आनंदी देशाच्या यादीत अव्वल क्रमांक मिळवला याला कारणही तसेच आहे. येथे अनेक गोष्टी निर्विवादपणे चांगल्या आहेत. सुंदर निसर्ग, विस्तीर्ण जंगले आणि तलावांचा देश. हा देश सर्वव्यापी सार्वजनिक सेवांसाठी देखील ओळखला जातो. आम्ही सुस्थितीत आहोत, देशाच्या बऱ्याच गोष्टी व्यवस्थित आहेत असा तेथील लोकांना विश्र्वास आहे. अधिकारावरील व्यापक विश्र्वास, गुन्हेगारीचा निम्नस्तर आणि समानता असे मत तेथील लोकांनी व्यक्त केले. आनंदाच्या अहवालातील एक महत्वाचे मोजमाप म्हणजे लोकांना किती सुरक्षित वाटते. फिनलँडने काही वर्षांपूर्वी आपल्या शिक्षण प्रणालीत आमूलाग्र बदल केला आहे. फिनलँड मधील शिक्षण प्रणाली ही जगातील सर्वोत्तम शिक्षण प्रणाली मानली जाते. फिनलँड देशात बेरोजगारीचा दर सर्वात कमी आहे. शिवाय तेथील आरोग्य प्रणाली देखील सर्वोत्तम आहे. त्यामुळे तेथील लोक सर्वाधिक आनंदी आहेत. फिनलँड देशाला इतर देशांपेक्षा वेगळे बनवणारा आणखी एक घटक म्हणजे समानता. जी प्रत्येकासाठी संधी निर्माण करते. मग ते कोणत्याही सामाजिक, आर्थिक पार्श्र्वभूमीचे असले तरीही. फिनलँडमध्ये मध्यमवर्ग जास्त आहे आणि गरिबी कमी आहे. भारतातही फिनलँड सारखी व्यवस्था निर्माण झाली तर भारतीय लोकही आनंदी राहतील. मात्र येथील व्यवस्था बदलण्याची इच्छाशक्ती कोणाकडे नाही म्हणूनच भारत आनंदी देशाच्या यादीत तळाच्या स्थानी आहे.

# मधुसूदन अग्रवाल 'कॉनसुलर ऑफ द इयर' पुरस्काराने सन्मानित

**दैनिक आपला विदर्भ**

**रिसोड/प्रतिनिधी :** मूळ रिसोड चे रहिवासी, अजंता फार्माचे सह-संस्थापक आणि उपाध्यक्ष तसेच प्रख्यात समाजसेवक, मधुसूदन अग्रवाल, यांना ऑनरेरी कॉन्सुलर कॉर्प्स डिप्लोमॅटिक-इंडिया (HCCD) तर्फे प्रतिष्ठित 'कॉनसुलर ऑफ द इयर' पुरस्काराने २२ मार्च रोजी दिल्ली येथे सन्मानित करण्यात आले.

मधुसूदन अग्रवाल हे मुंबईतील युगांडा वाणिज्य दूतावासाचे ऑनरेरी कॉन्सुल (पश्चिम विभाग) म्हणून कार्यरत असून, HCCD मुंबईचे महासचिव आणि HCCD इंडिया चे संचालक देखील आहेत. भारत-युगांडा संबंध बळकट करण्यासाठी त्यांचे विशेष योगदान, सामाजिक कार्य आणि मानवसेवेसाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. भारतातील विविध देशांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या २०० हून अधिक ऑनरेरी कॉन्सुल्सपैकी त्यांची निवड करण्यात आली.

HCCD कडून मिळालेला हा प्रतिष्ठित पुरस्कार माझ्यासाठी अत्यंत गौरवाची बाब आहे. हा सन्मान केवळ माझा नसून, माझ्या कुटुंबाचा, अजंता फार्मातील माझ्या सहकाऱ्यांचा तसेच 'ममता आणि मधुसूदन अग्रवाल फाउंडेशन'च्या माझ्या टीमचा आहे, जी समाजाच्या कल्याणासाठी अविरत मेहनत घेत आहे. युगांडाच्या सरकारचे आणि तेथील जनतेचे मी मनःपूर्वक आभार मानतो, ज्यांनी मला त्यांची सेवा करण्याची संधी दिली.

ते पुढे म्हणाले, या पुरस्कारामुळे माझी जबाबदारी वाढली आहे. मी माझ्या आरोग्य सेवांशी संबंधित उपक्रमांना आणखी व्यापक करण्यासाठी कटिबद्ध आहे, भारत-युगांडा संबंध अधिक दृढ करण्यासाठी प्रयत्नशील राहीन अग्रवाल यांनी युगांडा कॅन्सर इन्स्टिट्यूटला 'होप एक्स्प्रेस' मॅमोग्राफी व्हॅन प्रदान केली. जी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या २०१८ मधील युगांडा दौऱ्यादरम्यान अधिकृतपणे हस्तांतरित करण्यात आली. मोबाईल कॅन्सर तपासणी केंद्र आजपर्यंत ३००,००० हून अधिक महिलांना तपासणी सुविधा पुरवत आहे, ज्यामुळे १,५०० हून अधिक महिलांचे प्राण वाचविण्यात आले. अग्रवाल यांनी युगांडातील १०० हून अधिक बालकांना भारतात आणून त्यांचे मोफत हृदय शस्त्रक्रिया करून जीवदान दिले आहे. हा उपक्रम भविष्यातही सुरू असणार आहे.

युगांडामध्ये त्यांनी अपंगांसाठी कृत्रिम पाय बसविण्याचा उपक्रम हाती घेतला असून, १,००० कृत्रिम पाय देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. हे उपकरण भू-स्फोटक (landmine) आणि अपघातग्रस्तांना सक्षम जीवन जगण्यास मदत करणार आहे. भारतात, त्यांनी मुंबईतील संजीवनी ममता हॉस्पिटल (ममता आणि मधुसूदन अग्रवाल फाउंडेशनच्या अंतर्गत) स्थापन करून, तिथे मोफत कॅन्सर तपासणी शिबिरे आयोजित





केली आहेत. यामुळे स्तन आणि गर्भाशय ग्रीवा कर्करोगाचे लवकर निदान होऊन सुलभ उपचार मिळत आहेत.

मधुसूदन अग्रवाल यांना गोल्डन ज्युबिली मेडल (Golden Jubilee Medal) - युगांडाचे राष्ट्राध्यक्ष HE योवेरी मुसेवेनी यांनी प्रदान केलेला सर्वोच्च नागरी सन्मान -BLF बिझनेस इनोव्हेटर अवॉर्ड - (Asian Business Leadership Forum, दुबई) ण-ए चे मंत्री कक शेख नाहयान मबारक अल नाहयान यांच्या हस्ते प्रदान झाला. सेवा भूषण सन्मान - उत्तराखंडचे राज्यपाल यांच्याकडून प्रदान, आयकॉन्स ऑफ औरंगाबाद अवॉर्ड.

# जिल्हारुग्णालयात उष्माघात कक्ष स्थापन, उष्माघात कक्षासाठी स्वतन्त्र टीम तयार

**दैनिक आपला विदर्भ**

**नंदूरबार/प्रतिनिधी :** मार्च महिन्यात उन्हाची तीव्रता जाणवायला लागते. मार्च महिन्यात पासून तापमानात वाढ होण्यास सुरुवात होते.आज सरासरी ३५ ते ३७ डिग्री सेल्सियस च्या जवळपास तापमाना पोहचले होते. तापमानात वाढ होताच उष्माघातचे रुग्ण देखील मोठ्या प्रमाणात आढळतात. नंदुरबार जिल्हा रुग्णालयात स्वतंत्र उष्माघात कक्ष स्थापन करण्यात आला आहे.या कक्षात ६ बेड आरक्षित करण्यात आले असून संपूर्ण कक्ष वातानुकूलित ठेवण्यात आला आहे. वेगळी यंत्रणा या कक्षेसाठी उपलब्ध करून देण्यात आले असून एक स्वतंत्र वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी या कक्षात उपलब्ध राहणार आहे. पेशंटचे तापमान व परिस्थिती बघून त्याप्रमाणे त्याच्यावर उपचार करण्याची सर्व सोय उपलब्ध करण्यात आली आहे. नंदुरबार जिल्हा रुग्णालयासह





जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालयात देखील उष्माघात कक्ष स्थापन करण्यात आले आहे तेथे प्रत्येकी २ बेड तयार करण्यात आले आहे .मार्च ते जून या महिन्यात उन्हाची तीव्रता अधिक असल्यामुळे नागरिकांनी उन्हापासून वाचण्यासाठी उपाय केले पाहिजे. आपण घरा बाहेर निघताना सोबत छत्री किंवा टोपीच्या वापर करावा. शक्य असल्यास पाण्याची बाटली सोबत ठेवावी, लिंबू सरबत अधिक प्रमाणात घ्यावे त्याचप्रमाणे डार्क व गडद प्रकारचे कपडे परिधान करू नये . जिल्हा रुग्णालयात उष्माघात कक्ष तयार करण्यात आले असून जिल्हा आरोग्य यंत्रणा सज्ज आहे.

# मी त्याला स्वीकारण्यास तयार, हर्दिकसोबतच्या घटस्फोटानंतर नताशाचं नवं विधान!

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय क्रिकेटपटू हार्दिक पांड्या आणि मॉडेल-नृत्यांगना नताशा स्टॅन्कोविक सध्या चर्चेत आहेत. त्यांचा गेल्या वर्षी जुलै महिन्यात घटस्फोट झाला. दोघांनाही एक मुलगा आहे, मात्र आता त्यांचे वैयक्तिक आयुष्य नव्या वळणावर पोहोचले आहे. घटस्फोटानंतर हार्दिकच्या नवीन नात्याच्या चर्चा सुरू झाल्या, तर नताशाने देखील तिच्या पुढील वाटचालीबद्दल स्पष्ट मत मांडले आहे.

घटस्फोटाच्या अवघ्या एका महिन्यानंतरच हार्दिकचे नाव ब्रिटिश गायिका आणि टीव्ही स्टार जास्मिन वालियाशी जोडले गेले आहे. दोघेही सुट्टीसाठी एकाच ठिकाणी गेल्याचे चर्चेत आले आहे. मात्र, त्यांनी यावर कोणतेही अधिकृत वक्तव्य केलेले नाही. हार्दिकच्या या कथित प्रेमसंबंधांमुळे सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात चर्चेला उधान आले आहे.

एका मुलाखतीत नताशा स्टॅन्कोविकने तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल उघडपणे सांगितले आहे. ती म्हणाली की, गेल्या काही महिन्यांमध्ये ती अनेक चढ-उतारांमधून गेली आहे. मात्र, आता ती आयुष्याला नवीन दृष्टीकोनातून पाहत आहे. तसेच ती पुढे बोलताना म्हणाली की, मी पुन्हा प्रेमात पडायला तयार आहे. आयुष्याने जसे नवे अनुभव दिले, तसेच मी त्याला स्वीकारण्यास तयार आहे.

नताशाने मार्चमध्येच तिचा वाढदिवस साजरा केला. नताशाने एक अनुभव शेअर करत सांगितले की, त्या दिवशी ती संपूर्ण दिवस तिच्या मुलासोबत होती. संध्याकाळी मित्रांसोबत गप्पा मारल्या आणि हा दिवस तिच्यासाठी खास राहिला. तिने हे देखील सांगितले केले की, २०२४ हे वर्ष तिच्यासाठी खूप कठीण होते, पण त्या अनुभवाने तिला अधिक धैर्यशील बनवले. नताशाने स्पष्ट केले की, ती नातेसंबंधांना महत्त्व देते आणि तिच्या मते, प्रत्येक गोष्ट योग्य वेळी घडते.

# मतदार संघातील २३३ कोटींची पिक विम्याची रक्कम प्रलंबित

## आमदार सिद्धार्थ खरात यांनी मतदारसंघातील विविध समस्या बाबत विधानसभेत उपस्थित केला प्रश्न

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर-लोणार मतदार संघातील शेतकऱ्यांचा रखडलेला पिक विमा, वरली मटका, अवैध धंदे, शासकीय योजनेची रखडलेली कामे, कंत्राटदारांची अडकलेली देयके, आदी विविध प्रश्र्नांवर मतदार संघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम २९२ अंतिम आठवडा प्रस्तावा बाबत बोलताना मतदारसंघातील समस्या कडे लक्ष वेधत मतदारसंघातील प्रश्र्न तात्काळ निकाली लावण्याची मागणी केली. त्याचबरोबर मतदार संघातील तब्बल २३३ कोटी रुपयांची पिक विम्याची रक्कम शासनाकडे प्रलंबित असून ती रक्कम तात्काळ शेतकऱ्यांना देण्यात यावी अशी मागणी यावेळी आमदार सिद्धार्थ खरात यांनी विधानसभेत केली. महाराष्ट्र विधानसभा अंतिम आठवडा प्रस्तावात बोलताना आमदार सिद्धार्थ खरात यांनी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न देण्याचा ठराव मंजूर केला. त्याबद्दल शासनाचे अभिनंदन केले. तसेच शाहू, फुले,आंबेडकर यांच्या यांचे विचार पेलविणे अवघड आहे. शेतकऱ्यां्या प्रश्र्नावर शासनाने लक्ष द्यावे, शाहू फुले आंबेडकर यांच्या विचारावर चालण्याची गरज असल्याचेही मत व्यक्त केले. त्याचबरोबर महाराष्ट्र ची सुपुत्र इंदोर ची महाराणी पुण्यश्र्लोक अहिल्याबाई होळकर यांचे कार्यही महान आहे. त्यांनाही भारतरत्न देण्याची शिफारस करावी अशी मागणी त्यांनी केली. त्याचबरोबर राज्यातील कायदा सुव्यवस्था ढासाळली आहे. राज्यातून उद्योग स्थलांतरित होत आहेत. बेरोजगारीत प्रचंड वाढ होत आहे. कुजबूज गँग कडून महापुरुषांच्या कुटुंबाची बदनामी केली जात आहे. कोरटकर यांची विधाने महाराष्ट्राची मान खाली घालणारी आहे.त्यांना एवढी हिम्मत येते कुठून असा प्रश्र्नही त्यांनी उपस्थित केला. त्याचबरोबर शेतमालाला भाव नाही, शाळा बंद पडत आहेत.वारे माप निविदा काढून टेंडर काढले जात आहेत. दोन हजार रुपयांचे बजेट आणि २० हजार रुपयांच्या निविदा काढून कामे केली जात आहेत. त्यामुळे सदर कामेही पूर्ण झालेली नाहीत.यावरून लक्ष हटवण्यासाठी औरंगजेब, हलाल मटन, झटका मटन कवी कामरा यांच्या बद्दल



सत्तेतील लोकप्रतिनिधी कडून चर्चा होत आहेत. महाराष्ट्राच्या वैचारिक बाबीला ही बाब साजेशी नाही. असे मतही त्यावेळी त्यांनी व्यक्त केले. त्याचबरोबर मतदार संघातील वरली मटका चक्री आधी अवैध धंदे मी निवडून आल्यानंतर तीन महिने बंद होती. मात्र, आता ती पुन्हा सुरू झाली आहेत. हे अवैध धंदे कोणाच्या बळावर चालू आहेत. यामागे कोण आका आहे. असा प्रश्र्न त्यांनी उपस्थित केला. त्याचबरोबर एसपी आणि डीजे यांनी याकडे विशेष लक्ष देऊन मतदारसंघातील अवैध धंदे तात्काळ बंद करावे अन्यथा याला पोलीस प्रशासन जबाबदार राहील याबाबत मी विधानसभेत पूर्ण लक्षवेधीन असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. पैनगंगा, वैनगंगा नदीजोड प्रकल्प येतो आहे. त्या नदीचे पाणी पेनटाकळी चोखामेळा धरणात वळवल्यास मेहकर, लोणार, सिंदखेडराजा, देऊळगाव राजा तालुक्यात पाणी उपलब्ध होणार आहे. मेहकर शहराला कोराडी धरणातून पाणीपुरवठा करण्याचा प्रस्ताव प्रलंबित आहे. त्याचबरोबर पाच कोटी निधीही प्रलंबित आहे. त्यालाही शासनाने मंजुरात द्यावी आणि निधी द्यावा अशी मागणी केली. लोणार सरोवरच्या लगत असलेली शासकीय जमिनीची लँड बँक एकत्र करून पर्यटन विभागाने याकडे विशेष लक्ष देऊन लोणार शहराचे स्वरूप बदलावे अशी मागणी त्यांनी केली. मतदारसंघातील मृदू संधारण, जलसंधारण, पाणीपुरवठा, सार्वजनिक बांधकाम विभागाची सर्व कामे ठप्प आहेत.कंत्राटदारांना देयके अदा करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे कामे थांबलेली आहेत.महाराष्ट्र शासनाने मोठमोठ्या घोषणा केलेल्या आहेत. कामे मात्र बिलाअभावी रखडलेली आहेत. रखडलेली कामे ही मार्गी लावण्यासाठी त्या -त्या विभागाने तात्काळ निधी द्यावा अशी मागणी केली.त्याचबरोबर मतदार संघातील तब्बल २३३ कोटी रुपयांचा पिक विमा प्रलंबित असून तो शेतकऱ्यांना तात्काळ देण्यात यावा, मतदारसंघातील प्रवाशांच्या सोयीसाठी ३३ नवीन बस ची आवश्यकता असून त्या बस उपलब्ध करून द्याव्यात.बिहार राज्यातील महाबोधी विहार मुक्ती आंदोलन सुरू आहे. देशभरातील बौद्ध भिकूंनी आंदोलन सुरू केले आहे. महाराष्ट्रातही या आंदोलनाला चांगला प्रतिसाद मिळत आहे. महाराष्ट्र विधानसभेत या बाबतीत ठराव मंजूर करण्यात यावा, अशी मागणी यावेळी आमदार सिद्धार्थ खरात यांनी विधानसभेत केली.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# कॉपीमुक्त शिक्षणासाठी शासनाने पावले उचलावे

## आमदार सिद्धार्थ खरात यांचे विधानसभेत मागणी

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी : आमदार प्रशांत बंब यांनी शिक्षण संदर्भात उपस्थित केलेल्या प्रश्नाचे अभिनंदन करत आमदार सिद्धार्थ खरात यांनी शासनाने कॉपीमुक्त शिक्षण देण्यासाठी शासनाने पावले उचलावी, अशी मागणी विधानसभेत नियम १०१ आपत्कालीन चर्चेमध्ये केली. यावेळी आमदार सिद्धार्थ खरात यांनी विविध प्रश्नांना हात घालत शिक्षणासंदर्भात शासनाने निर्णयात्मक भूमिका घेण्याची मागणी केली.**

ते म्हणाले की, शैक्षणिक दर्जा हा ग्रामीण भागात घसरत चालला आहे. या ठिकाणी बसलेले बहुतेक सर्व लोक हे जिल्हा परिषद, नगर पालिका, महानगर पालिका या शाळेतून शिक्षण घेऊन आलेले आहेत.या शाळांमध्ये कॉपी नव्हती. शिक्षणाचा दर्जा चांगला होता. मात्र, गत काही वर्षांपासून कॉपी शिक्षण राबविले जात आहे. शिक्षण संस्थेचे चालक, मुख्याध्यापक, शिक्षक हेच कॉपी करून विद्यार्थ्यांना पास करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. शिक्षण व्यवस्थेचे यापूर्वी इतके अवमूल्यन कधी झाले नव्हते. त्यामुळे शिक्षण विभागाने कॉपीमुक्त शिक्षण देण्यासाठी पावले उचलावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

त्याचबरोबर मतदार संघातील बाभूळखेड येथील शिक्षक भांदुर्गे यांचे विशेष कौतुक करत भांदुर्गे शिक्षक लसावी, मसावी, अपूर्णांक, दशांश यांचा भागाकार एका क्षणात करतो.विशेष म्हणजे त्यांचे सर्व विद्यार्थीही हे एका क्षणात करतात. त्यामुळे ग्रामीण भागात आजही शैक्षणिक दर्जा कायम आहे. याकडे विशेष लक्ष देण्याची गरज असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. त्याचबरोबर त्यांनी मी एमपीएससी पास करण्यासाठी गणित, भूगोल पक्का असला पाहिजे, माझे गणित अत्यंत कच्चे असल्याने एम पी एस सी ची परीक्षा पहिल्याच वेळेस पास होता आली नाही.मला पहिलीपासून दहावीपर्यंत सर्व शैक्षणिक माहिती समजून घ्यावी लागली त्यानंतर मी कुठे एमपीएससी पास झालो.



शासनाने सीबीएससी अभ्यासक्रम जरूर आणावा. मात्र, ती सुविधा आहे का ? याचा विचार करावा अन्यथा त्याबाबत हट्टाहास करू नये, असे मत त्यांनी व्यक्त केले.

२००१ मध्ये कायम विनाअनुदानित शिक्षक शिक्षण हक्क कायदा कायद्याच्या अनुषंगाने २००९ मध्ये टप्प्याटप्प्याने अनुदान देण्याची धोरण शासनाने जाहीर केले. त्याचे अनुदान थांबले आहेत. त्यांना ते अनुदान द्यावे. उच्च शिक्षण महाविद्यालयाला सुद्धा २००१ ची पॉलिसी होती. त्याप्रमाणे शालेय विभागाने टप्प्याटप्प्याने त्यांना सुद्धा अनुदान देण्याचे धोरण जाहीर करावे, या संदर्भात शिक्षक संघटनेने नागपूर उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असता त्यावेळी न्यायालयाने या संदर्भात शासन निर्णय घेऊ शकते असा निर्णय दिला आहे.त्यामुळे कायम विनाअनुदानित उच्च महाविद्यालयांना टप्प्याटप्प्याने अनुदान देण्यात यावे अशी मागणी त्यांनी केली.

एकीकडे बुलेट ट्रेन, कोस्टल रोड, समृद्धी महामार्ग यावर कोट्यावधी रुपयाचा खर्च केला जात आहे. मात्र, अत्यंत महत्त्वाची बाब असलेल्या शिक्षणाबाबत लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे. शिक्षण विभागाने याबाबत धोरण जाहीर करावे, नेट सेट शिक्षकांना नोकरी नाही. कायम विना अनुदान महाविद्यालय चालवण्यासाठी नेट सेट पाहिजे. मात्र ते पगार देऊ शकत नाहीत. त्यामुळे त्यांनी अडचण निर्माण होते. अनुसूचित विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क फी मिळते. ती त्यांच्या खात्यात जमा होते. त्यांनी ती भरावी अशी अपेक्षा आहे. परंतु, त्यांच्याकडे पैसे नसल्याने ते ती रक्कम स्वतः खर्च करतात याबाबतही शासनाने धोरण जाहीर करावे, याकडे लक्ष वेधले.

## संक्षिप्त...

### मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा कालावधी आता ११ महिने

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देवून त्यांची रोजगार मिळण्याची क्षमता वाढविण्याकरीता मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत उमेदवारांचा प्रशिक्षण कालावधी ६ महिने एवढा निश्र्चित करण्यात आलेला होता. तथापि दि. १० मार्च २०२५ च्या शासन निर्णयानुसार उमेदवारांचा कार्य प्रशिक्षणाचा कालावधी हा पाच महिन्यांनी वाढविण्यात आला असून आता एकूण ११ महिने करण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त ग.प्र.बिटोडे यांनी दिली आहे.

जिल्ह्यातील शासकिय, निम शासकीय कार्यालय, खाजगी आस्थापना, महामंडळे तसेच विविध आस्थापनेमध्ये सहा महिने कार्यप्रशिक्षण पूर्ण केले आहे, अशा प्रशिक्षणार्थी यांनी पुढील पाच महिन्याच्या कार्यप्रशिक्षण कालावधी त्यांच्या संबंधित आस्थापनेवर दि. ३० एप्रिल, २०२५ च्या आधी रुजू व्हावे. सदर उमेदवारांना संबंधित आस्थापनेत पुन्हा रुजू झाल्याच्या दिनांकापासून ५ महिन्यांच्या कालावधीसाठी कार्यप्रशिक्षण अनुज्ञेय असेल. ऑनलाईन पोर्टलवर सुद्धा प्रशिक्षणार्थींची नोंदणी करणे आवश्यक राहिल, यांची नोंद घ्यावी. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### जन्म-मृत्यू प्रमाणपत्रासाठी फेर अर्जासह कागदपत्र सादर करण्याचे आवाहन; ११ ऑगस्ट 2023 ते २१ जानेवारी २०२५ मधील प्रमाणपत्र रद्द

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** उशिरा जन्म व मृत्यू नोंद केल्यामुळे प्रमाणपत्र देण्यावर लावण्यात आलेली स्थगिती उठविण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून जन्म-मृत्यू नोंदणीसाठी आता सुधारित कार्यपद्धती निश्र्चित केली आहे. त्यामुळे ज्यांची जन्म-मृत्यू नोंदणी रद्द झाली आहे, त्यांनी सुधारित शासन निर्णयानुसार पुराव्यानिशी संबंधित तहसिलदार यांचेकडे फेरअर्ज सादर करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

उशिरा जन्म व मुत्यू प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाकडे मोठ्या प्रमाणावर तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार शासनाने दि. २१ जानेवारी २०२५ नुसार उशिरा जन्म व मृत्यु प्रमाणपत्र वितरणाच्या कार्यवाहीस स्थगिती दिली होती. तथापि, दि. १७ मार्च २०२५ रोजीच्या पत्रानुसार ही स्थगिती रद्द करण्यात आली असून दि. ११ ऑगस्ट २०२३ ते २१ जानेवारी २०२५ या कालावधीत निर्गमित झालेली प्रमाणपत्रे तहसीलदार किंवा तालुका दंडाधिकारी या पदापेक्षा कमी दर्जाच्या अधिकाऱ्यांनी जारी केली आहेत, ती रद्द करण्यात आली आहेत. त्यामुळे ज्या नागरिकांचे प्रमाणपत्रे रद्द झाली आहेत, त्यांनी सार्वजनिक आरोग्य विभागाचे दि. १२ मार्च २०२५ च्या शासन निर्णयानुसार फेरअर्जासह कागदपत्रे संबंधित तहसीलदारांकडे पुराव्यानिशी सादर करावे.

**फेरअर्जासाठी आवश्यक पुरावे :** जन्माचा पुरावा(रुग्णालयाच्या नोंदी किंवा लसीकरणाचे पुरावे), मृत्यू नोंदणीसाठी शव विच्छेदन अहवाल, प्रथम खबरी अहवाल किंवा रुग्णालयीन कागदपत्रे, शैक्षणिक पुरावे (शाळेच्या प्रवेश-निर्गम रजिस्टरचा उतारा, बोनाफाईड प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला), रहिवासी पुराव्यासाठी मालमत्ता कराची पावती, पाणीपट्टी, वीज बिल, मालमत्ता पुराव्यासाठी सातबारा उतारा, नमुना ८-अ, वारस नोंदीचे फेरफार, मिळकत उतारा, नोंदणीकृत दस्त, ओळख पुरावा(वाहन परवाना, मतदान ओळखपत्र, आधार कार्ड, पॅन कार्ड, बँक, पोस्ट ऑफिस पासबुक इ.), कौटुंबिक पुरावा (परिवारातील सदस्यांचे जन्म प्रमाणपत्र, शिधापत्रिका, विवाह प्रमाणपत्र इत्यादी) पुरावे अर्जासोबत सादर करावे.

### पुणे जिल्ह्यातील ५ शाळांनी त्रुटीची पुर्तता केल्यामुळे अनुदानाचा टप्पा वितरीत - शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील ५ शाळांना पटसंख्येतील त्रुटीबाबत कळविण्यात आले होते. त्रृटी पूर्ण करण्यासाठी दिलेल्या मुदतीत सबंधित शाळांनी त्रृटी पुर्ण केल्यामुळे त्यांना अनुदानाचा टप्पा वितरीत करण्यात आल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विधानपरिषदेत दिली.

सदस्य जयंत आसगावकर यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना मंत्री भुसे बोलत होते. यावेळी सदस्य जगन्नाथ अभ्यंकर यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला.

शाळांच्या अनुदानाच्या बाबत सध्या अस्तित्वात असलेल्या धोरणास मागील प्रभावाने लागू करणे शक्य नसल्याचे सांगून श्री भुसे म्हणाले की, तसेच शाळांच्या पटतपासणीमध्ये जाणीवपूर्वक कोणी चूक केली असेल तर त्याची चौकशी करून कारवाई करण्यात येईल. विहित कालावधीत त्रृटी पुर्ण करणाऱ्या शाळांना २० टक्के वाढीव अनुदान अनुज्ञेय करण्यात आल्याची माहितीही मंत्री भुसे यांनी दिली.




## पाणी म्हणजे जीवन, रिसोड येथे जागतिक जल दिन साजरा

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** पाणी म्हणजे जीवन या म्हणी प्रमाणे पाणी किती महत्वाचे असते महत्व दुष्काळ व पाण्याचा तुटवडा पडतो तेव्हाच कळते जागतिक जलदिना निमित्त येथील महात्मा फुले विद्यालय रिसोड येथे महादेव आप्पा मुलंगे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य मुलंगे सर हे होते तर प्रमुख उपस्थिता मध्ये न प पाणीपुरवठा विभागाचे अभियंता नंदकिशोर डाखोरे, जलदूत विनोद बांगर, वनपाल विष्णू जटाळे, पोलीस पाटील गजानन कोरडे हे होते . पाण्याची महत्व विशद करताना मुलंगे म्हणाले पाण्याचे नियोजन व जमिनीतील पाण्याची पातळी कशी वाढवायची त्यासाठी कोणत्या उपाययोजना करावच्या यासाठी जनजागृती होणे अत्यंत गरजेचे आहे यासाठी शासनाने सुद्धा यावर्षी पुढाकार घेऊन जमिनीची जलपातळी कशा पद्धतीने वाढेल यासाठी जलतरा योजना सुरू केली असून त्यांची माहिती सामान्य नागरिका पर्यंत पोहोचविण्याची गरज निर्माण झाली आहे जमिनीतील पातळी वाढवली पाहिजे व त्याचप्रमाणे रिसोड येथील नगरपालिका पाणीपुरवठा करणारे पुरवठा अधिकारी जलदातेमुळे म्हणून ओळखणारे विनोद भाऊ बांगर यांना सध्याच्या उन्हाळ्याच्या परिस्थितीमध्ये पाण्याचा होणारा अपव्य टाळून त्यांना सहकार्य केल्यास खऱ्या अर्थाने जलदिन संपन्न झाल्याचा त्यांना आनंद होईल व रिसोड वासियांना चांगल्या पद्धतीचे पाणीपुरवठा करून सर्वांची तहान व पाण्याची गरज भागली जाईल सांगितले.

## शिवसेना महीला आघाडीने जिल्हाकचेरी समोर केले कुणाल कामराला जोडे मारो आंदोलन

दैनिक आपला विदर्भ




**बुलढाणा/प्रतिनिधी :** सुपारीबाज कॉमेडीयन कुणाल कामरा याच्या विरुध्द गुन्हा दाखल करुन त्यास अटक करावी अशी मागणी बुलढाणा जिल्हा महिला आघाडीच्या वतीने करण्यात आली असुन कामराच्या तैलचित्राला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोडे मारुन आंदोलन करुन निषेध नोंदविण्यात आला. कॉमेडीयन कुनाल कामरा याने विडंबनपर काव्य समाजमाध्यमांवर प्रसारीत केले त्या काव्यामुळे शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांच्या भावना दुखावल्या आहेत. शिवाय यापुर्वीही त्याने पंतप्रधान यांच्यावरही विडंबन काव्य केले होते. विशीष्ट पक्षाकडुन सुपारी घेऊन आमच्या पक्षनेत्यांवर जाणुन बुजून विडंबन करण्याचा प्रयत्न केल्या जात असेल तर शिवसेना यापुढे असे प्रकार खपवुन घेणार नाही. त्याला जसेच्या-तसे उत्तर देण्यात येईल. या विडंबनकार कामरा विरुध्द गुन्हा दाखल करुन त्यास तात्काळ अटक करावी. या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी यांच्या मार्फत देण्यात आले. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शिवसेना महिला आघाडी च्या वतीने जोरदार घोषणाबाजी करत कुणाल कामरा याच्या तैलचित्राला जोडे मारुन आंदोलन करत निषेध नोंदविला. यावेळी शिवसेना महीला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा मायाताई म्हस्के, अंजना खुपराव, कविता गायकवाड, अनिता झंवर,राधाताई फाटे, लताताई चव्हाण, कुमोद पाटील, संगिता बढे, रुपाली मिरगे यांच्यासह महीला आघाडीच्या सदस्या उपस्थित होत्या.


### ऑनलाईन गेमिंग आणि सायबर गुन्हेगारी संदर्भात कठोर कायदे करणार- गृह राज्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** ऑनलाईन गेमिग विषयी अनेक वेगवेगळे नियम असून त्यामध्ये एकच धोरण आणि कठोर कायदे आवश्यक असून त्यासाठी शासनस्तरावर कार्यवाही सुरू असल्याची माहिती गृहराज्य मंत्री योगेश कदम यांनी विधानपरिषदेत दिली. सदस्य इद्रिस नायकवडी यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना राज्यमंत्री कदम बोलत होते. यावेळी सदस्य प्रवीण दरेकर, भाई जगताप, श्रीकांत भारतीय यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला.

# खडकपुर्णा जलाशयात आठ बोटी केल्या नष्ट

**महसूल विभागाची धडक कारवाई**




दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** देऊळगाव राजा तालुक्यातील खडकपूर्णा धरणामध्ये रेतीचा अवैध उपसा करणाऱ्या बोटींचा शोध घेत महसूल व जिल्हास्तरीय शोध व बचाव पथकाने दि. २४ मार्च रोजी मोठी कारवाई करत आठ बोटी नष्ट केल्या. तसेच अशा प्रकारच्या खडकपूर्णा धरणामध्ये अवैध उपसा करणाऱ्यावर नियमितपणे कारवाई करण्याचे निर्देश उपविभागीय अधिकारी संजय खडसे यांनी संबधिताना दिले.

खडकपूर्णा धरणाच्या जलाशयामध्ये अवैध रेती उपसा करणाऱ्या बोटींचा शोध घेण्यासाठी महसूल विभाग व जिल्हा स्तरीय शोध व बचाव पथकाव्दारे विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. मोहिमेतर्गत दुपारी ४ वाजताच्या दरम्यान मौजे गारखेड व मंडपगाव शिवेजवळ शिवारात अवैध रेती उपसा करणाऱ्या चार फायबर बोटी व चार इंजिन बोटी अशा एकूण आठ बोटी पकडण्यात आल्या. त्यामधील मजूर पळून गेल्याने बोटी कोणाच्या आहेत, यांची माहिती मिळू शकली नाही. सदर आठ बोटी धरणाच्या किनाऱ्यावर स्फोटके लावून नष्ट करण्यात आल्या. सदर शोध मोहिम राबविताना अनेक अडचणीचा सामना करावा लागला. अवैध उपसा करणाऱ्या बोटी बेशरमाच्या झाडीमध्ये लपविण्यात आल्या होत्या. जिलेटिनच्या साहाय्याने बोटी नष्ट करण्याची प्रक्रिया रात्री ८ वाजेपर्यंत राबविण्यात आली.

सदर कारवाई जिल्हधिकारी डॉ. किरण पाटील व उपविभागीय अधिकारी संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली.

यावेळी तहसीलदार वैशाली डोंगरजाळ यांच्या नेतृत्वात नायब तहसीलदार प्रवीण घोटकर, सायली जाधव, मंडळ अधिकारी विजय हिरवे, काशिनाथ ईप्पर, रामदास मांटे, प्रल्हाद केदार, ग्राम महसूल अधिकारी विलास नागरे, परमेश्र्वर बुरकुल, संजय हंडे, सुरेश डोईफोडे, मधुकर उदार, संजय बरांडे, राजू तागवाले, आकाश खरात, तेजस शेटे, कृष्णा खरात, खडकपुर्णा प्रकल्प उपविभागाचे अधिकारी एस. जे. तल्हार, शोध व बचाव पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक तरासिंग पवार, पोलीस कॉन्स्टेबल गुलाबसिंग राजपूत, संदीप पाटील, सलीम बरडे, प्रदीप सोनुने आणि पोलीस विभागाचे सहाय्यक पोलीस निरक्षिक नारायण गीते आदी उपस्थित होते.

# मेहकर तालुक्यात लेआउटचा सावळा गोंधळ

## नगर रचना विभागाच्या परवानगी विना लेआऊट




दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी : घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी नागरिक संपूर्ण आयुष्य पदरमोड करून पै-पै जमा करतो. जमा झाल्यातून पैशातून छोटेसे टुमदार घराचे स्वप्न पाहतो. मात्र नागरिकांच्या या स्वप्न वर घाला घालीत विनापरवाना लेआउट मेहकर तालुक्यातील वासीयांच्या माथी मारले जात आहे. याबाबत अनेक तक्रारी सुद्धा झाल्याच्या ही सूत्रांची माहिती आहे.असे असतानाही सर्वसामान्य जनतेला फसविणाऱ्या लेआउट मालकावर अद्याप कारवाई झाली नसल्याने यामध्ये कोठे पाणी मुरले असा प्रश्न जनता उपस्थित करीत आहे.**


मेहकर येथे अनेक भागात लेआउट पडले आहेत. अवाच्या सव्वा दराने सर्वसामान्य जनतेच्या माथी या लेआउट मधील प्लॉट विक्री करून मारले जात आहे. प्लॉट पाडण्यासाठी व कायदेशीर रित्या विक्री करण्यासाठी लेआउट करताना नगररचना विभागाची परवानगी आवश्यक आहे. मात्र, येथील लेआउट मालकांनी नगररचना विभागाची परवानगी न घेताच प्लॉट विक्रीचा गोरख धंदा सुरू केलेला आहे. नगर रचना विभागाअंतर्गत परवानगी घेताना रस्ते, ओपन पेस, म्युनिटी आदी अनेक प्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक असते. मात्र, या सर्व नगररचना विभागाचा वॉच राहतो. मात्र, या सर्व नियमाला बगल देत येथील लेआउट मालकांनी तालुक्यातील वासीयांच्या माथी विनापरवाना व कोणत्याही सोयी सुविधा उपलब्ध न करता प्लॉट विक्री करून फसवणूक केली असल्याचा प्रकार समोर आला आहे. याबाबत मेकर तालुक्यातील अनेक नागरिकांनी तक्रारी केलेल्या आहेत. मात्र, त्याचबरोबर लोकप्रतिनिधींनी याबाबत चुप्पी साधल्याने सर्वसामान्य जनतेचा कोणी वाली नसल्याचे चित्र दिसून आले आहे.गोरगरीब जनतेची फसवणूक करणाऱ्या व विना परवाना लेआउट पाडून त्यातील प्लॉट सर्वसामान्य जनतेला विक्री करणाऱ्या लेआउट मालकावर कारवाई करावी, अशी मागणी जनतेकडून होत आहे. तूर्तास एवढे सविस्तर पुढील भागात



देविदास खनपटे
मुख्य संपादक

## विविध वृत्त...

### बुलढाणा शहरातील सहकार विद्या मंदिर येथे विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळावा





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** समाजाला काही देणं लागतं या दृष्टीकोनातून शेवटच्या घटकाला नजरेत ठेवून त्यांच्या फायद्यासाठी नेहमी प्रयत्न करत राहावा. यातूनच जगण्याला अर्थ मिळेल आणि आयुष्य जगण्याची दिशा, ध्येय प्राप्त होईल, असे प्रतिपादन नागपूर उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अनिल किलोर यांनी केले. बुलढाणा शहरातील सहकार विद्या मंदिर येथे आयोजित विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळावा उत्साहात संपन्न झाला. या मेळाव्याच्या उद्घाटनाप्रसंगी न्यायमूर्ती अनिल किलोर बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील, प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्ष मंजुषा देशपांडे, पोलीस अधीक्षक विश्व्व पानसरे, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्या सह विधिज्ञ, विविध योजनांचे लाभार्थी उपस्थित होते. विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळाव्यात विविध विभागांच्या योजनांची माहिती लोकांना होण्यासाठी विविध विभागाचे ५० हून अधिक स्टॉल्स उभारण्यात आले होते. या स्टॉल्सना लोकांनी भेटी देवून योजनांची माहिती जाणून घेतली. यावेळी न्यायमूर्ती किलोर यांच्या हस्ते विविध शासकीय योजनांच्या लाभार्थ्यांना लाभाचे वितरण करण्यात आले.

### त्या प्रकरणाची सीबीआय चौकशी करा माजी मंत्री सुबोध सावजी यांची राष्ट्रपतीकडे निवेदनाद्वारे मागणी

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** न्यायाधीश वर्मा यांच्यावर सीबीआय व ईडीमार्फत त्वरित कारवाई करून यांना ताब्यात घेण्यात यावे व अग्निशमन दलाच्या मुख्य अधिकाऱ्यास सुद्धा ताब्यात घेण्यात यावे, अशी मागणी माजी मंत्री सुबोध सावजी यांनी राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू,पंतप्रधान नरेंद्र मोदी, सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश संजीव खन्ना यांना निवेदनाद्वारे केली आहे.



निवेदनात नमूद केले आहे की, न्यायाधीश वर्मा यांच्या घरी जो काळा पैसा सापडला आहे. या प्रकरणी सीबीआय व ईडीमार्फत मार्फत चौकशी करावी त्यांना ताब्यात घेऊन गुन्हे दाखल करावे. विरोधकांवर सीबीआय व ईडीची कारवाई करून त्यांना जेरीस धरल्या जाते याचप्रमाणे या सत्य घटनेतील न्यायाधीश वर्मा यांच्यावर त्वरित कार्यवाही करावी, अशी मागणी माजी मंत्री सुबोध सावजी यांनी राष्ट्रपती, पंतप्रधान, सरन्यायाधीश, यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.निवेदनावर सुबोध सावजी यांची स्वाक्षरी आहे.

### विधानपरिषद विरोधी पक्षनेता अंबादास दानवे यांचा बुलढाणा जिल्हा दौरा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेता अंबादास दानवे हे गुरुवार दि. २७ मार्च २०२५ रोजी बुलढाणा जिल्हा दौरावर येत आहे. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे.



गुरुवार दि. २७ मार्च रोजी सकाळी ९ वाजता शिवनी आरमाळ ता.देऊळगाव राजा येथे आगमन व पुरस्कार प्राप्त युवा शेतकरी स्व.कैलास अर्जुनराव नागरे यांच्या कुंटुबियास सांत्वनपर भेट. सकाळी ९.३० वाजता शिवनी आरमाळ येथुन देऊळगाव राजा-जाफ्राबाद-सिल्लोड भराडी मार्गे पिशोरकडे प्रयाण करतील.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्यास अटक



दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी :** अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या नराधमास पोलिसांनी अटक केली आहे. घटनेबाबत प्राप्त माहितीनुसार २२ मार्च २०२५ रोजी ४ . ३० वाजताच्या सुमारास अल्पवयीन मुलगी उमरखेड येथील बसस्टॅण्ड उमरखेड येथे हजर असतांना बस चालक आरोपी संदिप विठ्ठलराव कदम वय-४० रा. उमरखेड याने अल्पवयीन मुलीला माझ्या सोबत नांदेड येथे चल म्हणून बस मध्ये बसवुन नांदेड येथे नेले. आरोपीची ड्युटी नांदेड ते नागपूर या बसवर असल्याने तो अल्पवयीन मुलीला सोबत घेवुन नागपूर येथे गेला.२३ मार्च २०२५ रोजी सकाळी ५ वाजताच्या सुमारास नागपुर बसस्थानक येथे पोहचले नंतर आरोपीने अल्पवयीन मुलीला त्याचे रुमवर घेवुन गेला व त्याचे रुमवर कोणीही नसल्याने त्याने जबरदस्तीने अल्पवयीन मुलीवर शरीरसंबंध केले. त्यानंतर आरोपी हा अल्पवयीन मुलीला घेवुन सोलापुर बस ने सोलापूर कडे जात आहे.अशी माहिती पोलिसांना प्राप्त होताच टिम तयार करुन सदर आरोपी हा उमरखेड बस स्थानक येथे येताच त्यास तातडीने चौकशी कामी ताब्यात घेतले आहे. तसचे अल्पवयीन मुलीचे जबानी रिपोर्ट वरुन पो स्टे उमरखेड येथे अप क्रमांक १७७/२०२५ कलम १३७(२), ६४(१), ९६ BNS, सह कलम ४,८,१२ बा.लै. अ.अ. सह कलम 3(2), va, 3(2)v, 3(1)w(i) (ii) अ.जा. ज. कायदा प्रमाणे गुन्हा नोंद केला आहे.सदर कारवाई यवतमाळ पोलीस अधिक्षक कुमार चिंता, अप्पर अधिक्षक पियुष जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी बी. जे. हर्षवर्धन, सा., पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि शिंदे, सपोनि सारीका राऊत, पोउपनि धरणे, पोउपनि सागर इंगळे यांनी केली. सदर गुन्ह्याचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी बी.जे. हर्षवर्धन हे करीत आहेत.

## कॉमेडियन कुणाल कामरा याच्या विरुध्द शिवसेनेची कारवाईची मागणी

दैनिक आपला विदर्भ




**मेहकर/प्रतिनिधी :** कॉमेडियन कुणाल कामरा यांनी उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्यावर खालच्या भाषेत टीका करणारे गाणे म्हटल्याने कामरा याच्या विरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी शिवसेनेकडून मेहकर पोलिसांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

शिवसेनेचे मुख्य नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या संबंधी वैयक्तिक व शिवराळ भाषेत टीका करणारे गाणे कॉमेडियन कुणाल कामरा याने जाहीर कार्यक्रमात सादर केले, हा प्रकार अतिशय निंदनीय असून या घृणास्पद प्रकाराची मेहकर तालुका शिवसेनेने कठोर शब्दात निंदा केली असून सदर कलावंतावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आज शिवसेनेकडून निवेदनाद्वारे करण्यात आली. सदर व्यक्तीवर कारवाई न झाल्यास शिवसेने तर्फे आंदोलन करण्यात येईल असा इशारा या निवेदनात देण्यात आला आहे.

यावेळी युवासेनेचे जिल्हाप्रमुख ऋषिकेश जाधव, तालुकाप्रमुख भूषण घोडे, शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुरेशतात्या वाळूकर, उपतालुका प्रमुख रोहिदास जाधव, ज्येष्ठ नेते परसराम मानघाले, नितीन राऊत, रामेश्वर भिसे, आकाश ढोरे, विकास जोशी, साबीर गवळी, अशोक पसरटे, रमेश गायकवाड, मंगेश गायकवाड, पियुष केळे,संजय ठोकळ, संतोष अवस्थी, श्याम डोंगरे, भैय्याज ठेकेदार, शेख अमीन, निलेश काळे, विशाल जाधव, चेतन गायकवाड, सुमित शिंदे, विलास आखाडे ,पिंटू भुजवटराव यांच्यासह असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

## बुलढाण्यात दंगलग्रस्त सदृश्यय परिस्थिती हाताळण्यासाठी पोलिसांचे मॉक ड्रिल

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** आगामी सण उत्सव आणि सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट करून उद्भवणाऱ्या परिस्थितीला हाताळण्यासाठी बुलढाणा पोलिसांनी आज जयस्तंभ चौक मध्ये मॉक ड्रिल केली. दंगा काबू पथकाने मॉक ड्रिल करत अनेकांचे लक्ष वेधले आहे. दंगल ग्रस्त सदृश्यय परिस्थिती निर्माण झाली की, रिस्पॉन्स कसा होईल व परिस्थितीवर नियंत्रण कसे मिळवायचे? याच पद्धतीचा हा डेमो असतो अशी प्रतिक्रिया बुलढाणा शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नरेंद्र ठाकरे यांनी दिली आहे.



## अवैध रेती उपसा विशेष मोहिम; मौजे इसरुल येथे चार बोटी नष्ट

दैनिक आपला विदर्भ







**बुलढाणा/प्रतिनिधी :** अवैध रेती उपसा करणाऱ्या बोटींचा शोध घेण्यासाठी जिल्ह्यामध्ये विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने बुलढाणा उपविभागीय कार्यालय व आपत्ती व्यवस्थापन पथकाव्दारे खडकपूर्णा धरणातील अवैध उपसा करणाऱ्या मौजे इसरुल येथे आज दि. २५ मार्च रोजी मोठी कारवाई करत चार बोटी नष्ट केल्या, अशी माहिती उपविभागीय अधिकारी शरद पाटील यांनी दिली.

सदर कारवाई जिल्हधिकारी डॉ. किरण पाटील व उपविभागीय अधिकारी शरद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. यावेळी तहसिलदार संतोष काकडे, संभाजी पवार, श्रीकृष्ण जाधव, मंडळ अधिकारी भगवानराव पवार, ग्राम महसूल अधिकारी योगेश भुसारी, ना.पो.का विलास पवार, सुनील डव्हळे, अनिल बोंद्रे, विनोद गिरी, नितीन काळे, महसूल सेवक प्रभाकर इंगळे, वाहन चालक संतोष भोपळे, तसेच पोलीस विभागाचे प्रतिनिधी, मंडळ अधिकारी, तलाठी उपस्थित होते. तसेच ब्लास्टिंगसाठी सिंदखेड राजाचे उपविभागीय अधिकारी संजय खडसे, तहसीलदार देऊळगाव राजाचे वैशाली डोंगरजाळ यांचे सहकार्य लाभले.